Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

। रविवार, दि. ४ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १७४ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

गोरगरिबांचे दुवा-आशीर्वाद हीच माझी खरी संपत्ती!

(पान २ वर)



भाजपच्या वाट्याला जागा; चंद्रकांत पाटील यांच्या निकटवर्तीय कौस्तुभ गावडे यांची उमेदवारी निश्चित

महायुतीतील पुणे शिक्षक मतदारसंघाचा तिढा सुटला?

विधान परिषदेच्या पुणे शिक्षक मतदारसंघाची जागा भाजपच्या वाट्याला गेल्याची शक्यता

जन सम्राट टाईम्स

मुंबई । महायुतीमधील विधान परिषदेच्या पुणे शिक्षक मतदारसंघाच्या जागेचा तिढा अखेर सुटला आहे. गेल्या काही दिवसांपासून सत्ताधारी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंद यांच्या शिवसेनेकडून सातत्याने पुणे शिक्षक मतदारसंघाच्या जागेवर दावा केला जात होता. त्यामुळे या जागेवरुन महातुतीत पेच निर्माण झाल्याचं बघायला मिळत होतं.

विशेष म्हणजे पुणे शिक्षक मतदारसंघासाठी एकनाथ शिंदेंचे निकटवर्तीय मंगेश चिवटे यांच्या नावाची देखील चर्चा होती. दुसरीकडे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे शिक्षक आणि पदवीधर या दोन्ही जागा परंपरेनुसार भाजपकडे आहेत, असा दावा केला होता. तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही पुणे शिक्षक मतदारसंघाच्या जागेसाठी बैठकांचा धडाका सुरु होता. पण या सर्व घडामोडींनंतर आता तीनही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेअंती ही जागा भाजपसाठी सुटल्याची माहिती आहे.

भाजपकडून मंत्री चंद्रकांत पाटील यांचे निकटवर्तीय कौस्तुभ गावडे यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. दरम्यान, कौस्तुभ गावडे यांनी



'एबीपी माझा'ला प्रतिक्रिया दिली आहे. "गेले तीन वर्षे शिक्षकांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावरची लढाई चांगल्या पद्धतीने लढण्याचं काम केलं आहे. मी सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करतो. एक युवा म्हणून माझ्यावर त्यांनी जो विश्वास व्यक्त केला आहे, तो येत्या काळात मी सार्थ करुन दाखवेन एवढीच ग्वाही महायुतीच्या सर्व नेत्यांना देतो", असं कौस्तुभ गावडे म्हणाले. "माझा जाहीरनामाच असा आहे की, जुनी पेन्शनसाठी लढाई, टीईटीसक्ती विरुद्धची लढाई असेल, जाचक संचमान्यच्या अटी आहेत, यामुळे मोठ्या प्रमाणावर शिक्षक अतिरिक्त होत आहेत. त्याविरुद्ध लढाई असूदेत. त्याचबरोबर शिक्षकांना सातत्याने शैक्षणिक कामकाज लागते. येत्या काळात शुन्य शैक्षणिक कामकाज मिळावे, जेणेकरुन विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचं काम आम्ही येत्या काळात करणार आहोत", अशी माहिती कौस्तुभ गावडे यांनी दिली. आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, महायुतीत भाजप पुणे पदवीधर, पुणे शिक्षक आणि नागपूर पदवीधर अशा तीन जागा लढणार आहे. तर अमरावती शिक्षक जागा शिवसेना, आणि छत्रपती संभाजीनगरची जागा राष्ट्रवादी काँग्रेस लढणार असल्याची माहिती मिळत आहे.

23 ऑक्टोबरला होणार मतदान

दरम्यान, विधान परिषदेच्या 3 पदवीधर आणि 2 शिक्षक जागांच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघ, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) विभाग पदवीधर मतदारसंघ आणि पुणे विभाग शिक्षक तसेच अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ अशा एकूण पाच जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. या सर्व जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख 6 ऑक्टोबर आहे. येत्या 23 ऑक्टोबरला या जागांसाठी मतदान होणार आहे. तर 27 ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

विशेष म्हणजे पुणे शिक्षक मतदारसंघासाठी एकनाथ शिंदेंचे निकटवर्तीय मंगेश चिवटे यांच्या नावाची देखील चर्चा होती. दुसरीकडे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे शिक्षक आणि पदवीधर या दोन्ही जागा परंपरेनुसार भाजपकडे आहेत, असा दावा केला होता. तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही पुणे शिक्षक मतदारसंघाच्या जागेसाठी बैठकांचा धडाका सुरु होता. पण या सर्व घडामोडींनंतर आता तीनही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेअंती ही जागा भाजपसाठी सुटल्याची माहिती आहे.

Selected

कॅप्टन स्मित मच्छार यांना मॅनकाइंड फार्माकडून १ कोटींचे बक्षीस

मुंबई: संकटाच्या काळात असाधारण धैर्य, संयम आणि जबाबदारीची जाणीव दाखवणाऱ्या कॅप्टन स्मित मच्छार यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी मॅनकाइंड फार्माने त्यांना १ कोटी रुपयांचे बक्षीस देण्याचा निर्णय घेतला आहे. कठीण परिस्थितीत त्यांनी दाखवलेल्या धैर्यामुळे आणि जबाबदारीने घेतलेल्या निर्णयांमुळे त्यांचे विशेष कौतुक होत आहे. कंपनीने हा निर्णय त्यांच्या धाडसी कामगिरीला आणि कर्तव्यनिष्ठेला सलाम म्हणून घेतल्याचे म्हटले आहे.

कठीण परिस्थितीत कोणताही निर्णय घेताना संयम आणि प्रसंगावधान अत्यंत महत्त्वाचे असते. कॅप्टन स्मित मच्छार यांनी अशाच परिस्थितीत शांतपणे परिस्थिती हाताळत आपली जबाबदारी पार पाडली. संकटाची तीव्रता लक्षात घेऊन त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे त्यांच्या कार्याची विशेष दखल घेतली जात आहे.

शिक्षक मतदारसंघात चुरस वाढली; 4 उमेदवारांचे नामांकन दाखल, संख्या पोहोचली 6 वर

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नामांकन प्रक्रिया वेगात सुरू आहे. शनिवारी नामांकन दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी 4 उमेदवारांनी प्रत्येकी एक नामांकन अर्ज दाखल केला. त्यामुळे आतापर्यंत नामांकन दाखल करणाऱ्या उमेदवारांची संख्या 6 झाली आहे. शनिवारी 7 व्यक्तींनी एकूण 15 नामांकन अर्ज घेतले. शनिवारी नामांकन दाखल करणाऱ्यांमध्ये अशोक वामन हिवाळे (अपक्ष), दिलीप भीमराव कडू (अपक्ष), गाजी मोहम्मद जाहेरोश (वंचित बहुजन आघाडी) आणि आशीष मनोहर अंबुलकर (अपक्ष) यांचा समावेश आहे. रविवारी शासकीय सुट्टी असल्याने नामांकन अर्जाची विक्री आणि दाखल करण्याची प्रक्रिया बंद राहणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार नामांकन दाखल करण्याची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर आहे. ७ ऑक्टोबर रोजी नामांकन अर्जाची छाननी होईल, तर ९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी मागे घेता येणार आहे. अमरावती मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी होणार असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदान करणाऱ्या शिक्षक मतदारांसाठी विशेष नैमित्तिक रजेची तरतूद करण्यात आली आहे. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने २२



सप्टेंबर रोजी जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघासह इतर पदवीधर व शिक्षक मतदारसंघांमध्ये द्विवार्षिक निवडणुका होत आहेत. पात्र मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील कलम १३५-ब अंतर्गत विशेष नैमित्तिक रजेची तरतूद आहे .खाजगी आस्थापनांमध्ये कार्यरत शिक्षक मतदारांना ही रजा लागू होणार नाही. अशा मतदारांना मतदानाची संधी मिळावी, यासाठी संबंधित खाजगी संस्थांना दोन तासांची विशेष सवलत देण्याचे निर्देश देण्यात आली आहेत. विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी नयना गुंडे यांनी शिक्षक मतदारांनी आपल्या मताधिकाराचा प्राधान्याने वापर करावा, असे आवाहन केले आहे. विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नामांकन प्रक्रिया वेगात सुरू आहे. शनिवारी नामांकन दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी 4 उमेदवारांनी प्रत्येकी एक नामांकन अर्ज दाखल केला. त्यामुळे आतापर्यंत नामांकन दाखल करणाऱ्या उमेदवारांची संख्या 6 झाली आहे. शनिवारी 7 व्यक्तींनी एकूण 15 नामांकन अर्ज घेतले. शनिवारी नामांकन दाखल करणाऱ्यांमध्ये अशोक वामन हिवाळे (अपक्ष), दिलीप भीमराव कडू (अपक्ष), गाजी मोहम्मद जाहेरोश (वंचित बहुजन आघाडी) आणि आशीष मनोहर अंबुलकर (अपक्ष) यांचा समावेश आहे. रविवारी शासकीय सुट्टी असल्याने नामांकन अर्जाची विक्री आणि दाखल करण्याची प्रक्रिया बंद राहणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार नामांकन दाखल करण्याची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर आहे. ७ ऑक्टोबर रोजी नामांकन अर्जाची छाननी होईल, तर ९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी मागे घेता येणार आहे. मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी होणार असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

निदा खानच्या वैवाहिक आयुष्यातही न्यायालयीन वळण

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: गंभीर गुन्ह्यांच्या प्रकरणांत न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जाणाऱ्या निदा एजाज खान हिच्या वैवाहिक आयुष्यातही आता कायदेशीर वळण आले आहे. निदाच्या पतीने घटस्फोटासाठी न्यायालयात अर्ज दाखल केल्याची माहिती समोर आली असून, त्यानुसार न्यायालयाने निदाला समन्स बजावले आहे. १६ ऑक्टोबर रोजी न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश तिला देण्यात आले आहेत. देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यात एका बहुराष्ट्रीय कंपनीतील तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरून धर्मांतर आणि विनयभंगासह विविध गंभीर आरोपांप्रकरणी संशयित दानिश शेख, तौसिफ अत्तार, निदा खान, छत्रपती संभाजीनगरातील एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल आणि घरमालक हानिफ शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मुंबई नाका पोलिस ठाण्यात त्याच कंपनीतील एका तरुणाने दिलेल्या फिर्यादीवरून तौसिफ अत्तार, दानिश शेख, शाहरुख कुरेशी, रझा मेमन आणि निदा खान यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल असल्याचे समोर आले आहे.

या दोन्ही प्रकरणांमध्ये नाशिकरोड तसेच नाशिक जिल्हा न्यायालयाने निदाला सशर्त जामीन मंजूर केला आहे. या गुन्ह्यांमुळे निर्माण झालेल्या न्यायालयीन आणि सामाजिक दबावाच्या पार्श्वभूमीवर आता



तिच्या वैवाहिक आयुष्यातही तणाव निर्माण झाल्याचे वृत्त आहे. पतीने घटस्फोटासाठी न्यायालयात अर्ज केल्याने निदाला आता वैवाहिक वादातील कायदेशीर प्रक्रियेलाही सामोरे जावे लागणार आहे.

गर्भावस्थेच्या पार्श्वभूमीवर प्रकरणाला मानवी पैलू निदा खान सध्या गर्भवती असल्याने या प्रकरणाला मानवी पैलूही जोडला गेला आहे. यापूर्वी जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने बाळाच्या हिताचा आणि मानवी हक्कांचा विचार महत्त्वाचा असल्याचे नमूद केले होते.

न्यायालयाने नवजात बाळाला तुरुंगातील वातावरणाचा सामना करावा लागू नये, या मानवी दृष्टिकोनातून जामीन देताना निरीक्षण नोंदवले होते. त्यामुळे निदाच्या गर्भावस्थेच्या पार्श्वभूमीवर न्यायालयीन प्रक्रियेत बाळाच्या हिताचा मुद्दाही महत्त्वाचा ठरत आहे. दरम्यान, निदाविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यांतील आरोप हे अद्याप न्यायालयीन प्रक्रियेत असून त्याबाबत अंतिम दोषसिद्धी झालेली नाही. त्यामुळे तपास आणि न्यायालयीन सुनावणीदरम्यान समोर येणाऱ्या पुराव्यांच्या आधारेच आरोपांबाबत अंतिम निष्कर्ष निघणार आहे. आता १६ ऑक्टोबर रोजी निदा खान न्यायालयात हजर राहणार असल्याने तिच्या वैवाहिक प्रकरणातील पुढील घडामोडींकडे लक्ष लागले आहे. एकीकडे गंभीर गुन्ह्यांची न्यायालयीन प्रक्रिया आणि दुसरीकडे घटस्फोटाचा अर्ज, अशा दुहेरी कायदेशीर आव्हानांना तिला सामोरे जावे लागत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

भारतात नेस्लेच्या 'लो-फॅट डेअरी व्हाईटनर'चा नमुना 'असुरक्षित'?

मुंबई : सध्या भारतात खासकरून महाराष्ट्रात खाद्य पदार्थांची भेसळ यावर तुकाराम मुंडे यांची आणि त्यांच्या डिपार्टमेंटची जोरदार कामगिरी सुरु आहे . या कारवाईची धास्ती एवढी वाढली आहे कि आता चक्क चायनीजच्या लॉलिपॉपचा सुद्धा लाल आर्टिफिशियल कलर गायब झाला असून लॉलीपॉप आता सफेद पांढऱ्या रंगाचे म्हणजे कलर विरहित झाले आहेत . आणि तसेही भारतात मिळणाऱ्या जागतिक कंपन्यांच्या वस्तूंची क्वालिटी ही इतर जगात भेटणाऱ्या सेम वस्तूंच्या तुलनेत निकृष्ट आहे .

'एफडीए'चे १२ अधिकारी गोत्यात; निलंबनाची टांगती तलवार!

जन सम्राट टाईम्स



नाशिक| प्रतिनिधी: अन्न व औषध प्रशासनातील (एफडीए) कथित अनियमितता आणि गैरप्रकारांच्या प्रकरणाने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. राज्यातील तब्बल १२ अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता असून, त्यामध्ये नाशिक विभागातील पाच अधिकाऱ्यांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. कागदोपत्री कारवायांमध्ये अनियमितता, न्यायालयीन आदेशाचे पालन न केल्याचे आरोप आणि अन्य प्रशासकीय बाबींच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी सुरू असल्याचे समजते. चौकशीअंती दोष आढळल्यास संबंधितांवर निलंबनासह कठोर शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता आहे. नाशिकमधील पाच अधिकारी चौकशीच्या फेऱ्यात या प्रकरणात नाशिक विभागातील अन्न सुरक्षा अधिकारी (गुप्तवार्ता) अ. र. दाभाडे, अन्न सुरक्षा अधिकारी अ. उ. रासकर, गो. वे. कासार, यो. रो. देशमुख आणि सु. दे. महाजन या पाच अधिकाऱ्यांची नावे चर्चेत आहेत. या अधिकाऱ्यांसह राज्यातील अन्य संबंधित अधिकाऱ्यांचा मिळून १२ जणांचा समावेश असल्याची माहिती आहे. मात्र, चौकशी पूर्ण होऊन अधिकृत आदेश जारी होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांवरील आरोप सिद्ध झाले आहेत, असे म्हणता येणार नाही. न्यायालयीन आदेशाच्या पालनाचा मुद्दा या प्रकरणात न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाले का, कागदोपत्री करण्यात आलेल्या कारवायांमध्ये नियमांचे पालन झाले का आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रशासकीय प्रक्रियेत अनियमितता झाली का, याची तपासणी केली जात असल्याचे समजते. प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती असून, चौकशीच्या निष्कर्षानंतर पुढील कारवाईचे स्वरूप स्पष्ट होणार आहे. अन्नसुरक्षेच्या यंत्रणेवर प्रश्नचिन्ह अन्न व औषध प्रशासनाकडे नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाची जबाबदारी असते. अन्नातील भेसळ रोखणे, अन्नपदार्थांची गुणवत्ता तपासणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे ही या यंत्रणेची प्रमुख कामे आहेत. त्यामुळे याच विभागातील अधिकाऱ्यांवर गैरप्रकारांचे आरोप झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार का, याकडे आता प्रशासनासह नागरिकांचे लक्ष लागले आहे. अधिकृत आदेशाकडे लक्ष १२ अधिकाऱ्यांवरील चौकशीचा अहवाल आणि त्यानंतर होणाऱ्या प्रशासकीय कारवाईकडे लक्ष लागले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होते की अन्य शिस्तभंगाची कारवाई केली जाते, हे अधिकृत आदेशानंतरच स्पष्ट होणार आहे. अन्न व औषध प्रशासनातील (एफडीए) कथित अनियमितता आणि गैरप्रकारांच्या प्रकरणाने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. राज्यातील तब्बल १२ अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता असून, त्यामध्ये नाशिक विभागातील पाच अधिकाऱ्यांचा समावेश असल्याची माहिती समोर आली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

अभिजीत दीपकेंवर रामदास आठवलेंचा जोरदार हल्लाबोल

'बाबासाहेबांबद्दल बेताल वक्तव्य थांबवा, माफी मागा'; आठवलेंचा इशारा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याबाबत कॉकरोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दीपके यांनी केलेल्या वक्तव्यावरून राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटत आहेत. दीपके यांच्या वक्तव्यावर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी तीव्र आक्षेप घेतला असून, त्यांनी बेताल वक्तव्ये थांबवून माफी मागावी, अशी मागणी केली आहे. अभिजीत दीपके यांनी बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित नेहरू यांच्यामुळे देशातील नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळाल्याचे वक्तव्य केल्याचे वृत्त आहे. या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना रामदास आठवले यांनी बाबासाहेबांच्या योगदानाचा अवमान होईल अशी विधाने करू नयेत, असे म्हटले आहे. रामदास आठवले यांच्या म्हणण्यानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून देशाला दिशा दिली. दीपके यांनी इतिहासाचा संदर्भ लक्षात घेऊन वक्तव्य करावे, असेही त्यांनी म्हटले. दीपके हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबतही टीका करत असल्याचा उल्लेख आठवले यांनी केला. लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या व्यक्तींवर टीका करताना जबाबदारीने बोलावे, असे आवाहन त्यांनी केले.

'बेताल विधाने थांबवा' दीपके यांनी चुकीची किंवा अवमानकारक विधाने थांबवावीत, अन्यथा रिपब्लिकन पक्षाकडून कडक भूमिका घेतली जाईल, असा इशारा रामदास आठवले



यांनी दिला. तसेच बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल दीपके यांनी माफी मागावी, अशी मागणीही आठवले यांनी केली आहे. दीपकेंच्या आंदोलनांचीही चर्चा अभिजीत दीपके हे 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक असून, अलीकडच्या काळात त्यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक व्यवस्थेशी संबंधित विविध मुद्द्यांवर आंदोलने झाली आहेत. २ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी त्यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाल्याचे वृत्त आहे. दीपके आणि त्यांच्या राजकीय भूमिकेवर रामदास आठवले यांनी यापूर्वीही भाष्य केले आहे. ऑगस्टमध्ये आठवले यांनी दीपके यांना रिपब्लिकन पक्षात येण्याचे निमंत्रण दिल्याचेही वृत्त प्रसिद्ध झाले होते.

आता बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित नेहरू यांच्यावरील कथित वक्तव्यावरून दोन्ही बाजूंतील राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याबाबत कॉकरोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दीपके यांनी केलेल्या वक्तव्यावरून राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटत आहेत. दीपके यांच्या वक्तव्यावर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी तीव्र आक्षेप घेतला असून, त्यांनी बेताल वक्तव्ये थांबवून माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

अभिजीत दीपके यांनी बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित नेहरू यांच्यामुळे देशातील नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळाल्याचे वक्तव्य केल्याचे वृत्त आहे. या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना रामदास आठवले यांनी बाबासाहेबांच्या योगदानाचा अवमान होईल अशी विधाने करू नयेत, असे म्हटले आहे. 'बाबासाहेबांनी संविधानातून देशाला दिशा दिली' रामदास आठवले यांच्या म्हणण्यानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून देशाला दिशा दिली. दीपके यांनी इतिहासाचा संदर्भ लक्षात घेऊन वक्तव्य करावे, असेही त्यांनी म्हटले. दीपके हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबतही टीका करत असल्याचा उल्लेख आठवले यांनी केला. लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या व्यक्तींवर टीका करताना जबाबदारीने बोलावे, असे आवाहन त्यांनी केले.

गोरगरिबांचे दुवा-आशीर्वाद हीच माझी खरी संपत्ती!

पालकमंत्री गुलाबराव पाटील ; पाळधीत सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजने'चे विशेष शिबिर

जन सम्राट टाईम्स

पाळधी / जळगाव । प्रतिनिधी : "आई-वडिलांची जागा या जगात कोणीही घेऊ शकत नाही. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कोणत्याही मदतीने भरून निघत नाही. मात्र अशा लेकरांचे शिक्षण थांबू नये, त्यांच्या गरजा अपूर्ण राहू नयेत आणि परिस्थितीमुळे त्यांचे भविष्य अंधारात जाऊ नये, ही जबाबदारी शासनासोबतच समाजानेही स्वीकारली पाहिजे. गोरगरिबांचे दुवा आणि आशीर्वाद हीच माझी खरी संपत्ती आहे," असे भावनिक प्रतिपादन पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजने'चा लाभ पात्र बालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी GPS ग्रुपच्या पुढाकाराने पाळधी येथील शासकीय विश्रामगृहात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराला दिवसभरात मोठा प्रतिसाद मिळाला. एकूण १,१५९ जणांनी नोंदणी केली, तर त्यापैकी ८४३ लाभार्थ्यांची कागदपत्रे पूर्ण प्राप्त झाली. त्यामुळे या ८४३ लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याची प्रक्रिया सुलभ झाली असून, उर्वरित लाभार्थ्यांची अपूर्ण कागदपत्रे पुढील आठ दिवसांत पूर्ण करून घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी ऋषिकेश काळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. 'योजना कागदावर न राहता लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावी' पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, "नियतीने एखाद्या लेकराच्या डोक्यावरचे आई-वडिलांचे छत्र हिरावून घेतले असेल, तरी त्याच्या



भविष्यावर अंधार पसरू देणार नाही. गरिबीचे चटके आम्ही स्वतः अनुभवले आहेत. त्यामुळे गरजूंच्या मदतीचे मोल आम्हाला माहीत आहे. शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्या पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत." गरजू कुटुंबांसाठी शासनाकडून मिळणारी मदत महत्त्वाची असते, असे नमूद करत त्यांनी GPS ग्रुपच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

"आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि सत्कार्य करणाऱ्यांच्या पाठीशी परमेश्वर नेहमी उभा असतो," असेही त्यांनी सांगितले. बाल संगोपन योजनेसाठी स्वतंत्र वेबसाइटचा प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी ऋषिकेश काळे यांनी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. बाल संगोपन योजनेचा लाभ अधिक सुलभपणे पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र वेबसाइट विकसित करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून सुमारे ४८ लाख रुपयांच्या निधीचा प्रस्ताव असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यातील एकल महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी आणि त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुमारे १ कोटी ८१ लाख रुपयांचे उद्योजकता प्रशिक्षण केंद्र प्रस्तावित आहे. या दोन्ही उपक्रमांसाठी मिळून सुमारे २ कोटी २९ लाख रुपयांच्या निधीची मान्यता प्रक्रिया पुढे नेण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. एक लाखांहून अधिक एकल महिलांचे सर्वेक्षण जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी महिला व बाल विकास विभागाच्या विविध सेवा व योजनांची माहिती दिली. पालकमंत्र्यांच्या पाठबळातून महिला व बाल विकास विभागाच्या सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बाल विकास भवन उभारण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

बाल संगोपन व प्रायोजकत्व योजनांसह कौटुंबिक कलहाच्या परिस्थितीत समुपदेशन सुविधांचाही गरजू कुटुंबांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्यात ग्रामीण भागातील एक लाखांहून अधिक एकल महिलांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, शहरी भागातील सर्वेक्षणाचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पात्र एकल महिलांना संजय गांधी निराधार योजनेसह विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांनी विशेष शिबिरामुळे शासनाची योजना पात्र कुटुंबांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. एकल महिलांच्या बालकांना आवश्यक बोनाफाईड प्रमाणपत्रे सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षण विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले. सामाजिक उपक्रमांची पुढची पायरी GPS ग्रुपचे मार्गदर्शक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी प्रास्ताविकात ग्रुपच्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. सामाजिक गरज ओळखून GPS ग्रुपच्या माध्यमातून सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. मागील महिन्यात एक हजारांहून अधिक अनाथ व गरजू बालकांना शालेय साहित्य, गणवेश, बूट आणि स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले होते. त्या उपक्रमाची पुढची पायरी म्हणून पात्र बालकांना शासनाच्या बाल संगोपन योजनेचा नियमित आधार मिळवून देण्यासाठी हे विशेष शिबिर आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था आणि स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते यांच्या समन्वयातून पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

स्वस्त धान्य दुकानदारांची भुसावळ येथे ५ ऑक्टोबरला महत्त्वपूर्ण बैठक

जन सम्राट टाईम्स



भुसावळ | प्रतिनिधी : अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाच्या आदेशानुसार भुसावळ तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता भुसावळ येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आली आहे. स्वस्त धान्य दुकानदारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. संघटनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष राजेश अंबुसकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीस राज्य उपाध्यक्ष भागवत पाटील, जिल्हा सचिव सुनील अंभोरे आणि जिल्हा प्रसिद्धीप्रमुख कैलास उपाध्याय उपस्थित राहणार आहेत. मार्जिन मनीसह विविध प्रश्नांवर चर्चा शासकीय धान्य गोदामातून स्वस्त धान्य दुकानदारांना प्रत्येक गोणीमध्ये ५० किलो ५८० ग्रॅम वजनाचे धान्य देण्यात यावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणारे धान्य स्वच्छ व मनुष्याच्या सेवनासाठी योग्य असावे. अस्वच्छ अथवा खराब धान्याचा पुरवठा करू नये, अशीही मागणी आहे. रास्त भाव दुकानदारांना धान्य वितरण करताना प्रति क्विंटल दोन किलो या प्रमाणात धान्याची हाताळणी, स्वच्छता आणि वितरणातील तूट मंजूर करण्यात यावी, या मागणीवरही बैठकीत चर्चा होणार आहे. याशिवाय स्वस्त धान्य दुकानदारांचे मार्जिन मनी, धान्य वितरणातील अडचणी आणि अन्य प्रलंबित प्रश्नांवर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून चर्चा करण्यात येणार आहे. कथित खोट्या तक्रारींच्या मुद्द्यावरही चर्चा राज्यात तसेच भुसावळ तालुक्यातील काही स्वस्त धान्य दुकानदारांविरोधात खोट्या व निराधार तक्रारी करण्यात येत असून त्यातून दुकानदारांना त्रास सहन करावा लागत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. या प्रश्नावरही बैठकीत चर्चा करून पुढील भूमिका निश्चित केली जाणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. बैठकीला भुसावळ तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भुसावळ तालुका अध्यक्ष महेंद्र सपकाळे, शहराध्यक्ष आरिफ मिर्झा, महिला आघाडीच्या अध्यक्षा टीना धांडे आणि तालुका कार्याध्यक्ष पंकज पाटील यांनी केले आहे.अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाच्या आदेशानुसार भुसावळ तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता भुसावळ येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आली आहे. स्वस्त धान्य दुकानदारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. संघटनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष राजेश अंबुसकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीस राज्य उपाध्यक्ष भागवत पाटील, जिल्हा सचिव सुनील अंभोरे आणि जिल्हा प्रसिद्धीप्रमुख कैलास उपाध्याय उपस्थित राहणार आहेत.

धुळ्यात विवाहितेवर लैंगिक अत्याचाराचा आरोप!

तिघांना अटक; ब्लॅकमेल केल्याचाही आरोप

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: धुळे शहरातील आझादनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ३० वर्षीय विवाहितेवर तिघांनी लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. नटराज टॉकीज परिसरातील रामदेव बाबा नगरात हा प्रकार घडल्याची माहिती असून, या प्रकरणी आझादनगर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. संबंधित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधित आरोपींकडून तिच्यावर अत्याचार करण्यात आला. तसेच तिचे व्हिडिओ तयार करून त्याद्वारे ब्लॅकमेल व मानसिक त्रास दिल्याचा आरोपही महिलेने केला आहे. या त्रासाला कंटाळून महिलेने आझादनगर पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केल्याचे वृत्त आहे. घटनेची माहिती समोर आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल



यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. या घटनेची माहिती पोलिसांना देत तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आल्याचे वृत्त आहे. दरम्यान, पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत तिघांना ताब्यात घेतले. उपलब्ध वृत्तानुसार साहिल हबीब पिंजारी, बाबू इरफान शाह आणि समद शेख जब्बार यांच्याविरुद्ध आझादनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसारही गुन्हा दाखल करण्यात आल्याचे वृत्त आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरात अफवा पसरू नयेत यासाठी नागरिकांनी कोणत्याही अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांनी नागरिकांना कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले आहे. घटनेनंतर सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी आझादनगर पोलीस ठाण्यात उपस्थित राहत कारवाईबाबत माहिती घेतली. प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे. धुळे शहरातील आझादनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ३० वर्षीय विवाहितेवर तिघांनी लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. नटराज टॉकीज परिसरातील रामदेव बाबा नगरात हा प्रकार घडल्याची माहिती असून, या प्रकरणी आझादनगर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. संबंधित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

पिपल्स रिपब्लिकन पार्टीच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी राजाभाऊ सावळे

जिल्ह्यात संघटन विस्ताराची जबाबदारी

जन सम्राट टाईम्स



मलकापूर। प्रतिनिधी: पिपल्स रिपब्लिकन पार्टीच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते राजाभाऊ सावळे यांची निवड करण्यात आल्याची घोषणा पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाकडून करण्यात आली आहे. मुंबई येथील पक्ष कार्यालयात ३ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीत राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीपभाई कवाडे यांच्या आदेशाने ही निवड झाल्याचे पक्षाच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीपभाई कवाडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत राजाभाऊ सावळे यांच्या निवडीचा निर्णय घेण्यात आल्याचे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. निवडीची माहिती जयदीप कवाडे यांनी प्रसारमाध्यमांना प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. राजाभाऊ सावळे यांच्या निवडीमुळे बुलढाणा जिल्ह्यातील आंबेडकरी तसेच बहुजन चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचा दावा पक्षाकडून करण्यात आला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचे उद्दिष्ट पक्षाने व्यक्त केले आहे. जिल्हाभर संघटन विस्ताराचे आव्हान बुलढाणा जिल्ह्यात पक्षाची संघटना तळागाळापर्यंत पोहोचविणे, कार्यकर्त्यांना संघटित करणे आणि पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे ही जबाबदारी राजाभाऊ सावळे यांच्यावर सोपविण्यात आल्याचे पक्षाच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. जिल्ह्यातील विविध भागांत पक्षाची संघटनात्मक उपस्थिती वाढविण्यासाठी आगामी काळात प्रयत्न केले जाणार असल्याचेही पक्षाकडून सांगण्यात आले. राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीपभाई कवाडे यांनी राजाभाऊ सावळे यांचे अभिनंदन करून त्यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा जिल्ह्यात पक्ष संघटना मजबूत व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. पक्षाच्या नावाच्या गैरवापराविरोधात कायदेशीर कारवाईच्या सूचना दरम्यान, पिपल्स रिपब्लिकन पार्टीच्या नावाचा अनधिकृत वापर अथवा गैरवापर करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध नियमानुसार कायदेशीर तक्रार दाखल करण्याच्या सूचना राष्ट्रीय नेतृत्वाने राजाभाऊ सावळे यांना दिल्याचे पक्षाच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले

पाळधीत जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: धरणगाव तालुक्यातील पाळधी येथे श्रीराम ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी, दैनंदिन जीवनातील आवश्यक खबरदारी, कायदेविषयक हक्क तसेच सकारात्मक आणि कृतीशील जीवनशैली याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक तथा इंजिनिअर



विक्रम गुलाबराव पाटील होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवनात आरोग्याची योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन केले. वय वाढले तरी जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक असून, ज्येष्ठांनी कृतीशील आणि सकारात्मक विचारसरणी कायम ठेवावी, असे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याबाबत योग्य खबरदारी घेणे, वेळोवेळी आवश्यक तपासण्या करून घेणे आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा अंगीकार करणे गरजेचे असल्याचेही पाटील यांनी नमूद केले. ज्येष्ठ नागरिक हे कुटुंब आणि समाजासाठी अनुभवाची मोठी शिदोरी असून, त्यांच्या अनुभवाचा पुढील पिढ्यांना निश्चितच लाभ होतो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. अशोक पवार यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विविध कायदेविषयक तरतुदी आणि अधिकारांबाबत सविस्तर माहिती दिली.

नवरात्रोत्सवातून पर्यावरणाचा जागर; ललित माळी यांचा उपक्रम

जन सम्राट टाईम्स



धुळे। प्रतिनिधी: नवरात्रोत्सव म्हणजे स्त्रीशक्तीचा उत्सव. या उत्सवाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत 'झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश देण्याचा उपक्रम नगरसेवक ललित माळी यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. नवरात्रोत्सवादरम्यान मान्यवरांचा सत्कार पुष्पगुच्छाऐवजी वृक्ष देऊन करण्यात येणार असल्याची माहिती मोटिवेशनल ट्रेनर प्रियंका माने यांनी प्रसारमाध्यमांना दिली. स्त्रीशक्तीचा जागर करतानाच पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे. उत्सवाच्या माध्यमातून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. दरवर्षीप्रमाणे यंदाही नगरसेवक ललित माळी यांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांसाठी भव्य नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'एक पाऊल पर्यावरणासाठी, तर एक संधी तुमच्या कलागुणांसाठी' या संकल्पनेतून नगरसेवक ललित माळी आणि भारतीय जनता पक्षाच्या वतीने 'धुळे गरबा महोत्सव 2.0' आयोजित करण्यात आला आहे. प्रशिक्षणाला ६ ऑक्टोबरपासून सुरुवात नागावबारी येथील केशरानंद मंगल कार्यालयात ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत गरबा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान सायंकाळी ७ वाजल्यापासून जीटीपी स्टॉपसमोरील महर्षी व्यास नगर येथे गरबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यंदाच्या गरबा महोत्सवात महाराष्ट्र आणि गुजरातमधील गरबा संस्कृतीचा संगम अनुभवायला मिळणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. महिलांना आपल्या कलागुणांना वाव मिळावा आणि नवरात्रोत्सव आनंदोत्साहात साजरा करता यावा, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमात धुळे शहरातील जास्तीत जास्त महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन नगरसेवक ललित माळी आणि मोटिवेशनल ट्रेनर प्रियंका माने यांनी केले आहे. झाडे जगवा'चा संदेश देण्याचा उपक्रम नगरसेवक ललित माळी यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. नवरात्रोत्सवादरम्यान मान्यवरांचा सत्कार पुष्पगुच्छाऐवजी वृक्ष देऊन करण्यात येणार असल्याची माहिती मोटिवेशनल ट्रेनर प्रियंका माने यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

धुळे अत्याचार प्रकरणी आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

सतीष महाले यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन; निष्पक्ष तपास, पीडितेचा इन-कॅमेरा जबाब व जलद न्यायाची मागणी

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी : धुळे शहरातील महिलेवरील कथित लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी धुळे जिल्हा शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सतीष तात्या महाले यांनी धुळे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले. आझादनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या प्रकरणात पोलिसांनी तिघांना अटक करून गुन्हा दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन अटक केलेल्या आरोपींविरुद्ध लागू कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. तसेच पीडितेचा इन-कॅमेरा जबाब नोंदवून प्रकरणाचा निष्पक्ष आणि सखोल तपास करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाची सुनावणी जलदगतीने होऊन पीडितेला लवकर न्याय मिळावा, अशी अपेक्षाही शिवसेनेने व्यक्त केली आहे. तसेच तपासात आरोपींना कोणत्याही व्यक्तीचे प्रत्यक्ष किंवा



अप्रत्यक्ष पाठबळ असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवरही कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. दरम्यान, या घटनेनंतर धुळे शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. आमदार अनुप अग्रवाल यांनीही आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली असून, या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ६ ऑक्टोबर रोजी धुळे शहर बंदचा इशारा दिल्याचे वृत्त आहे. शिवसेनेच्या निवेदनात पीडितेला न्याय मिळणे ही प्रशासनाची तसेच समाजाची जबाबदारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तपास कोणत्याही दबाव किंवा हस्तक्षेपाशिवाय करून दोषींवर कायद्याच्या चौकटीत कठोर कारवाई करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया तातडीने राबवावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील, जिल्हाप्रमुख सतीष तात्या महाले, महानगरप्रमुख संजय वाल्हे, महिला जिल्हाध्यक्ष हेमा हेमाडे, नगरसेविका मंगला सोनवणे, सिद्धार्थ करणकाळ, किरण आगलावे, प्रतीक शिंदे, सचिन मोरे, प्रफुल सोनवणे, दिनेश चव्हाण, विष्णू जावडेकर, प्रतिभा सोनवणे, सुरेखा रोकडे, गायत्री लंगडे, संध्या कांदोडे, कुणाल सूर्यवंशी, सोनाली सोनवणे, शुभम जगदाळे, अजय जगदाळे, केतन भारती, साहिल छत्रे, योगेश वाणी, प्रतीक बोपे, मयूर सोनार, देवेंद्र गायकवाड, बॉबी गायकवाड, सुनील वाल्हे, चेतन भामरे, संदीप पाटील, सागर पाटील, मुकेश अमृतकर, मनोज कोळी, सागर चव्हाण आदी उपस्थित होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

निवडणूक आयोगाविरोधात आज ठाकरे बंधूंचा 'गर्जना' मोर्चा!

राज-उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मेट्रो सिनेमा ते मुंबई महापालिका मुख्यालय मोर्चा

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कारभारावर आक्षेप नोंदवत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुढाकाराने आज, रविवार, ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत 'गर्जना' मोर्चा काढण्यात येणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा होणार असून, निवडणूक आयोगाच्या कामकाजासह मतदार याद्या आणि एसआयआर प्रक्रियेवरून दोन्ही पक्षांनी आक्षेप घेतला आहे. पूर्वी जाहीर करण्यात आलेल्या मार्गात पोलिसांच्या विनंतीनुसार बदल करण्यात आला आहे. आता मेट्रो सिनेमा येथून मोर्चाला सुरुवात होऊन मुंबई महानगरपालिका मुख्यालयापर्यंत मोर्चा जाणार आहे. मोर्चानंतर महापालिका मुख्यालय परिसरात जाहीर सभा होण्याची शक्यता आहे. उपलब्ध माहितीनुसार सकाळी १० वाजल्यापासून कार्यकर्ते आणि नागरिक जमण्यास सुरुवात करणार असून, सुमारे ११ वाजता मोर्चाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. 'मतदारांच्या हक्कासाठी' ठाकरे बंधूंचे आवाहन निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात आणि मतदारांच्या हक्कांच्या मुद्द्यावर हा मोर्चा असल्याचे ठाकरे बंधूंकडून सांगण्यात आले आहे. या मोर्चात केवळ पक्षाचे कार्यकर्तेच नव्हे, तर नागरिक आणि इतर राजकीय पक्षांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मोर्चात पक्षीय झेंड्यांऐवजी तिरंगा घेऊन सहभागी होण्याची भूमिका यापूर्वी मांडण्यात आली होती. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विविध विरोधी पक्ष आणि संघटनांकडून



करण्यात येत आहे. एसआयआर आणि मतदार याद्यांशी संबंधित मुद्द्यांवरूनही राजकीय वातावरण तापले आहे. ठाकरे बंधूंच्या मोर्चामुळे या मुद्द्याला मुंबईत पुन्हा एकदा राजकीय व्यासपीठ मिळणार आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी सहभागी होणार? ठाकरे बंधूंनी या मोर्चासाठी सर्व राजकीय पक्षांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटातील नेते या मोर्चात सहभागी होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. काही वृत्तांमध्ये दोन्ही पक्षांच्या सहभागाची शक्यता व्यक्त करण्यात आली असली, तरी प्रत्यक्ष उपस्थितीबाबत अंतिम चित्र मोर्चाच्या वेळीच स्पष्ट होणार आहे. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई परिसरात दोन्ही पक्षांकडून बैठका घेऊन कार्यकर्त्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. भाजपकडून ठाकरे बंधूंवर टीका दरम्यान, ठाकरे बंधूंच्या आंदोलनावरून सत्ताधारी भाजपकडूनही प्रतिक्रिया उमटल्या आहेत. मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नीतेश राणे यांनी शुक्रवारी झालेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाच्या संदर्भाने ठाकरे बंधूंवर टीका केली. त्या आंदोलनात काही वादग्रस्त व्यक्तींच्या समर्थनार्थ फलक झळकवल्याचा दावा करत राणे यांनी ठाकरे बंधूंना लक्ष्य केले. तसेच आदित्य ठाकरे यांच्याबाबतही त्यांनी काही आरोप केले. मात्र, राणे यांनी केलेले हे आरोप हे त्यांचे राजकीय दावे आहेत, त्यांची स्वतंत्र पुष्टी झाल्याचे या वृत्तासाठी उपलब्ध स्रोतांत दिसून येत नाही. मोर्चानंतर काय? ठाकरे बंधूंच्या या संयुक्त मोर्चाकडे केवळ निवडणूक आयोगाविरोधातील आंदोलन म्हणूनच नव्हे, तर दोन्ही पक्षांच्या संयुक्त राजकीय भूमिकेच्या दृष्टीनेही पाहिले जात आहे. मोर्चानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्याकडून कोणती भूमिका मांडली जाते, पुढील आंदोलनाची दिशा काय असेल आणि इतर विरोधी पक्षांचा त्याला किती प्रतिसाद मिळतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कारभारावर आक्षेप नोंदवत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुढाकाराने आज, रविवार, ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत 'गर्जना' मोर्चा काढण्यात येणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा होणार असून, निवडणूक आयोगाच्या कामकाजासह मतदार याद्या आणि एसआयआर प्रक्रियेवरून दोन्ही पक्षांनी आक्षेप घेतला आहे. पूर्वी जाहीर करण्यात आलेल्या मार्गात पोलिसांच्या विनंतीनुसार बदल करण्यात आला आहे. आता मेट्रो सिनेमा येथून मोर्चाला सुरुवात होऊन मुंबई महानगरपालिका मुख्यालयापर्यंत मोर्चा जाणार आहे. मोर्चानंतर महापालिका मुख्यालय परिसरात जाहीर सभा होण्याची शक्यता आहे. उपलब्ध माहितीनुसार सकाळी १० वाजल्यापासून कार्यकर्ते आणि नागरिक जमण्यास सुरुवात करणार असून, सुमारे ११ वाजता मोर्चाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. 'मतदारांच्या हक्कासाठी' ठाकरे बंधूंचे आवाहन कारभाराविरोधात आणि मतदारांच्या हक्कांच्या मुद्द्यावर हा मोर्चा असल्याचे ठाकरे बंधूंकडून सांगण्यात आले आहे. या मोर्चात केवळ पक्षाचे कार्यकर्तेच नव्हे, तर नागरिक आणि इतर राजकीय पक्षांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मोर्चात पक्षीय झेंड्यांऐवजी तिरंगा घेऊन सहभागी होण्याची भूमिका यापूर्वी मांडण्यात आली होती. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विविध विरोधी पक्ष आणि संघटनांकडून करण्यात येत आहे. एसआयआर आणि मतदार याद्यांशी संबंधित मुद्द्यांवरूनही राजकीय वातावरण तापले आहे. ठाकरे बंधूंच्या मोर्चामुळे या मुद्द्याला मुंबईत पुन्हा एकदा राजकीय व्यासपीठ मिळणार आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी सहभागी होणार? ठाकरे बंधूंनी या मोर्चासाठी सर्व राजकीय पक्षांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. काही वृत्तांमध्ये दोन्ही पक्षांच्या सहभागाची शक्यता व्यक्त करण्यात आली असली, तरी प्रत्यक्ष उपस्थितीबाबत अंतिम चित्र मोर्चाच्या वेळीच स्पष्ट होणार आहे. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई परिसरात दोन्ही पक्षांकडून बैठका घेऊन कार्यकर्त्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

कुऱ्हा हरदो शाळेत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्रींना अभिवादन



जन सम्राट टाईम्स

कुऱ्हा हरदो । प्रतिनिधी : जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५७ वी जयंती आणि भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांची १२२ वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यानिमित्त 'एक तास महापुरुषांसाठी' या उपक्रमातून दोन्ही महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. वैशाली संसारे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याची विद्यार्थ्यांना मुद्देसूद माहिती दिली. महात्मा गांधी यांच्या स्मरणार्थ २ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक अहिंसा दिन' म्हणून साजरा केला जातो. सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने गांधीजींनी दिलेला संदेश आजही समाजासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. लालबहादूर शास्त्री यांच्या कार्यावर प्रकाश टाकताना त्यांनी आधुनिक भारताच्या जडणघडणीत शास्त्री यांचे योगदान उल्लेखनीय असल्याचे सांगितले. 'मूर्ती लहान, पण कीर्ती महान' या उक्तीप्रमाणे त्यांचे कार्य प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या साधेपणा, कर्तव्यनिष्ठा आणि देशसेवेच्या विचारातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. श्रीमती कुमुदिनी माहुरे यांनी विद्यार्थ्यांना अहिंसेचा मार्ग का स्वीकारला पाहिजे, याबाबत मार्गदर्शन केले. अहिंसा, सत्य, संयम आणि परस्पर सन्मान या मूल्यांचे दैनंदिन जीवनातील महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी देवयानी सोनवणे, प्रगती माळी आणि पूजा पाटील या विद्यार्थिनींनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याचा परिचय आपल्या भाषणातून प्रभावीपणे करून दिला. महापुरुषांच्या चरित्रातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार उपक्रमशील शाळा या संकल्पनेअंतर्गत महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त 'एक तास महापुरुषांसाठी' हा उपक्रम डॉ. वैशाली संसारे यांच्या संकल्पनेतून शाळेत राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विविध महापुरुषांची चरित्रात्मक पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली जातात. महापुरुषांचे विचार, कार्य आणि जीवनसंघर्ष विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम आणि मूल्याधिष्ठित विचारांची रुजवण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे.

संविधान भवनासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे गुलाबराव पाटील यांचे आश्वासन

भीमसेनेचे जिल्हाध्यक्ष वाल्मिक जाधव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

जन सम्राट टाईम्स

धरणगाव। प्रतिनिधी : पहाण गावातील दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत प्रस्तावित संविधान भवनासाठी लवकरच निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन महाराष्ट्राचे पाणीपुरवठा मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. त्यामुळे पहाण गावातील संविधान भवनाच्या उभारणीचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि गुजरात राज्यातील कामगार नेते तथा महामंत्री, माजी महापौर सुरेशभाई सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत यासंदर्भात चर्चा झाली. यावेळी पहाण गावातील संविधान भवनासाठी आवश्यक निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. वाल्मिक जाधव यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा संविधान भवनासाठी राष्ट्रीय भीमसेनेचे जिल्हाध्यक्ष वाल्मिक जाधव यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी पालकमंत्री



गुलाबराव पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेत पहाण गावातील नागरिकांची मागणी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत संविधान भवनासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. या पाठपुराव्यानंतर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी संविधान भवनासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिल्याचे वाल्मिक जाधव यांनी सांगितले. संविधान भवन ठरणार सामाजिक उपक्रमांचे केंद्र पहाण गावात संविधान भवन उभारण्यात आल्यानंतर सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रमांसाठी हे केंद्र उपयोगी ठरणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी भवनाचा उपयोग करण्याचा मानस असल्याचे सांगण्यात आले. याप्रसंगी गुजरात राज्याचे कामगार नेते तथा महामंत्री सुरेशभाई सोनवणे आणि धरणगाव नगरीचे माजी सभापती मुकुंदराव ननवरे यांच्यासह संबंधित पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. संविधान भवनासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे राष्ट्रीय भीमसेना तसेच पहाण ग्रामस्थांच्या वतीने आभार मानण्यात आले.

पहाण गावात दुष्काळी पंचनामे शांततेत; तलाठी-ग्रामसेवकांनी बांधावर

जन सम्राट टाईम्स

पहाण। (प्रतिनिधी): महाराष्ट्रातील विविध भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर पहाण गावात दुष्काळी पंचनाम्याची प्रक्रिया शांततेत पार पडली. गावातील शेतकऱ्यांनी पंचनाम्याच्या प्रक्रियेसाठी आवश्यक सहकार्य केल्याने कामकाज सुरळीतपणे पूर्ण करण्यात आले. पहाण गावातील तलाठी व ग्रामसेवक नंदकिशोर पाटील यांनी प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची स्थिती, शेतीसमोरील अडचणी तसेच दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची माहिती जाणून घेण्यात आली. शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष समजून घेतल्यानंतर शासनस्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल तसेच लवकरच मदत व निधी उपलब्ध होण्याबाबत आश्वासन देण्यात आल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांचे पंचनाम्यासाठी सहकार्य दुष्काळी पंचनाम्याच्या प्रक्रियेत विलास चुडामण पाटील, आबाजी गोबा पाटील, देविदास हरिदास पाटील, विलास जगन्नाथ पाटील,



मगन जयराम पाटील, नारायण काशिनाथ पाटील, पुरुषोत्तम तुकाराम, पवन विलास, राधेश्याम अभिमन, गुरुदास शंकर, रितेश युवराज, राधेश्याम अभिमान, हेमंत प्रभूलाल, मिलिंद पाटील यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी सहकार्य केले. पंचनाम्याच्या वेळी पहाण गावातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. प्रशासनाने प्रत्यक्ष बांधावर जाऊन पिकांची पाहणी केल्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा असून, पंचनाम्याच्या आधारे पुढील मदत व उपाययोजना लवकरात लवकर करण्यात याव्यात, अशी अपेक्षा यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्रातील विविध भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर पहाण गावात दुष्काळी पंचनाम्याची प्रक्रिया शांततेत पार पडली. गावातील शेतकऱ्यांनी पंचनाम्याच्या प्रक्रियेसाठी आवश्यक सहकार्य केल्याने कामकाज सुरळीतपणे पूर्ण करण्यात आले. पहाण गावातील तलाठी व ग्रामसेवक नंदकिशोर पाटील यांनी प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची स्थिती, शेतीसमोरील अडचणी तसेच दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची माहिती जाणून घेण्यात आली. शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष समजून घेतल्यानंतर शासनस्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल तसेच लवकरच मदत व निधी उपलब्ध होण्याबाबत आश्वासन देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

स्वच्छता ही सेवा व सेवा संकल्प अभियानातून पारोळ्यात विशेष स्वच्छता अभियान

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: 'स्वच्छता ही सेवा' आणि 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पारोळा नगरपरिषदेच्या वतीने शहरातील नवीन भाजीपाला मार्केट, स्वर्गीय मीनाताई ठाकरे व्यापारी संकुल तसेच बाजारपेठ परिसरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानास लोकनियुक्त नगराध्यक्ष दादासाहेब चंद्रकांत बी. पाटील, उपनगराध्यक्ष अॅड. रोहनदादा मोरे, मुख्याधिकारी तुषार नेरकर, आरोग्य सभापती डॉ. मंगेशआण्णा तांबे, शिवसेना गटनेते अमृतभाऊ चौधरी, भाजपा गटनेते धीरजभाऊ महाजन यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्ष दादासाहेब चंद्रकांत बी. पाटील यांनी महात्मा गांधी यांनी स्वच्छतेकडे केवळ आरोग्याचा विषय म्हणून न पाहता निरोगी, सुसंस्कृत आणि जबाबदार समाजासाठी ती मूलभूत गरज मानली असल्याचे सांगितले. गांधीजींच्या स्वच्छतेच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची



जोड देत नगरपरिषदेच्या माध्यमातून बाजारपेठ परिसरात स्वच्छता व कचरा संकलनाची मोहीम राबविण्यात आली. उपनगराध्यक्ष अॅड. रोहन मोरे यांनी नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ ठेवून स्वच्छतेच्या चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. मुख्याधिकारी तुषार नेरकर यांनी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे तसेच बाजारपेठ परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत व्यापारी व नागरिकांना मार्गदर्शन केले. 'स्वच्छता ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी' आरोग्य सभापती डॉ. मंगेश तांबे यांनी, "स्वच्छता ही केवळ नगरपरिषदेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे," असा संदेश दिला. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून नागरिकाभिमुख सेवा, स्वच्छ व सुंदर पारोळा तसेच लोकसहभागातून शाश्वत स्वच्छता व्यवस्था निर्माण करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. नगरसेवकांसह अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग अभियानात नगरसेवक मनीषकुमार भाईदास पाटील, दीपकभाऊ अनुष्ठान, बापूसाहेब रमेश मिस्तरी, नितीनभाऊ सोनार, राजेंद्र हिम्मत पाटील, प्रमोदशेठ कासार, अमोलदादा गोविंद शिरोळे, नरेंद्रभाऊ राजपूत, पंकजभाऊ राजेंद्र मराठे, विवेकभाऊ पतंगराव पाटील, भूषणभाऊ टिपरे, नजीर खान हमीद खान, राजेंद्र मोतीलाल कासार, गोपालशेठ मुरलीधरसा दाणेज, संदेश अशोक शिरोडे, सुदामबापू चौधरी, मनोजभाऊ जगदाळे, छोटू हिरामण पाटील, इमरान शेख सलीम, विनोद पाटील, दगडू पवार सर यांच्यासह अन्य नगरसेवक व नगरसेविका सहभागी झाले.

वाघूर धरणातून रब्बीसाठी दोन आवर्तने सोडण्याची मागणी

सिंचन लाभधारक समितीचे ना. गुलाबराव पाटील व ना. गिरीष महाजन यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

पाळधी । प्रतिनिधी: वाघूर धरण सिंचन लाभधारक समितीच्या सदस्यांनी आज पाळधी येथे राज्याचे मंत्री ना. गुलाबरावजी पाटील यांची भेट घेऊन वाघूर धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याद्वारे रब्बी पिकांसाठी पाण्याची दोन आवर्तने सोडण्याची मागणी केली. याबाबतचे निवेदन ना. गिरीषभाऊ महाजन यांनाही देण्यात आले. यंदा राज्यासह जळगाव जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत रब्बी हंगामातील पिकांसाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध होणे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असल्याचे समितीने निवेदनातून नमूद केले आहे. जळगाव, जामनेर आणि भुसावळ तालुक्यांसाठी महत्त्वाचे असलेल्या वाघूर धरणात सध्या ७३ टक्के जिवंत पाणीसाठा असल्याचे समितीच्या निवेदनात म्हटले आहे. या उपलब्ध पाणीसाठ्यातून लाभक्षेत्रातील डावा व उजवा कालवा यांना रब्बी पिकांसाठी दोन आवर्तने सोडल्यास धरणातील जिवंत पाणीसाठ्यापैकी केवळ सुमारे ३ ते ४ टक्के पाण्याचा वापर होईल, असा दावा समितीने केला आहे. रब्बी पिकांसाठी दोन आवर्तने उपलब्ध झाल्यास लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पिके घेणे सुलभ होईल. तसेच पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्यासही मदत होईल, त्यामुळे शेतकऱ्यांसमोरील चारा टंचाईचा प्रश्न काही प्रमाणात कमी



होण्यास हातभार लागेल, असे समितीने निवेदनात म्हटले आहे. वाघूर धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून रब्बी हंगामासाठी दोन आवर्तने सोडण्याच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा आणि त्यासाठी आवश्यक सहकार्य करावे, अशी विनंती सिंचन लाभधारक समितीच्या वतीने दोन्ही मंत्र्यांकडे करण्यात आली. यावेळी सिंचन लाभधारक समितीचे सदस्य लालचंद पाटील, तुषार महाजन, किशोर चौधरी, मिलिंद चौधरी, राजेंद्र चौधरी, धनराज राणे, अरुण पाटील तसेच परिसरातील शेतकरी उपस्थित होते.वाघूर धरण सिंचन लाभधारक समितीच्या सदस्यांनी आज पाळधी येथे राज्याचे मंत्री ना. गुलाबरावजी पाटील यांची भेट घेऊन वाघूर धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याद्वारे रब्बी पिकांसाठी पाण्याची दोन आवर्तने सोडण्याची मागणी केली. याबाबतचे निवेदन ना. गिरीषभाऊ महाजन यांनाही देण्यात आले. यंदा राज्यासह जळगाव जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत रब्बी हंगामातील पिकांसाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध होणे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असल्याचे समितीने निवेदनातून नमूद केले आहे. जळगाव, जामनेर आणि भुसावळ तालुक्यांसाठी महत्त्वाचे असलेल्या वाघूर धरणात सध्या ७३ टक्के जिवंत पाणीसाठा असल्याचे समितीच्या निवेदनात म्हटले आहे. या उपलब्ध पाणीसाठ्यातून लाभक्षेत्रातील डावा व उजवा कालवा यांना रब्बी पिकांसाठी दोन आवर्तने सोडल्यास धरणातील जिवंत पाणीसाठ्यापैकी केवळ सुमारे ३ ते ४ टक्के पाण्याचा वापर होईल, असा दावा समितीने केला आहे. रब्बी पिकांसाठी दोन आवर्तने उपलब्ध झाल्यास लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना होईल. तसेच पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्यासही मदत होईल, त्यामुळे शेतकऱ्यांसमोरील चारा टंचाईचा प्रश्न काही प्रमाणात कमी होण्यास हातभार लागेल, असे समितीने निवेदनात म्हटले आहे. वाघूर धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून रब्बी हंगामासाठी दोन आवर्तने सोडण्याच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध

चौकशीचे आदेश!

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: निवडणूक आयोगाद्वारे राबवल्या जाणाऱ्या 'विशेष सखोल पुनरावलोकन' (SIR) प्रक्रियेवरून वादाच्या भोवऱ्यात सापडलेले मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. त्यांच्याविरुद्ध २० वर्षे जुन्या एका मोठ्या प्रशासकीय आणि भ्रष्टाचार प्रकरणाची पुन्हा चौकशी सुरू करण्यात आली आहे. केरळचे गृहमंत्री रमेश चेन्नितला यांनी त्यांच्यावरील भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी स्वरूपाचा निधीचा गैरवापर अशा गंभीर आरोपांची 'व्हिजिलन्स' (दक्षता विभाग) द्वारे चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.ज्ञानेश कुमार १९८८ च्या बॅचचे आयएएस (IAS) अधिकारी आहेत. २००६ मध्ये ते केरळमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे (PWD) सचिव म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळातील आर्थिक गैरव्यवहाराबाबत मलयानकीझू वेणुगोपाल यांनी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत आरोप करण्यात आला आहे की, २००६ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव असताना, ज्ञानेश कुमार यांनी 'केरळ राज्य परिवहन प्रकल्प' (KSTP) अंतर्गत रस्ते बांधकामाचे कंत्राट देताना मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता आणि गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन केले होते.वाढत्या वादामुळे, २००६ साल संपण्यापूर्वीच ज्ञानेश कुमार यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवपदावरून हटवून त्यांची बदली करण्यात आली होती. त्यावेळी प्राथमिक चौकशी करण्यात आली होती.

अजितदादांचे नाव वापरु नका; स्वत:च्या कर्तृत्वावर लढा!

सोमेश्वर साखर कारखाना निवडणुकीत सुनेत्रा पवारांचा विरोधकांना थेट इशारा

जन सम्राट टाईम्स

बारामती। प्रतिनिधी: हजारो शेतकरी सभासदांच्या संसाराचा आधार असलेल्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीला आता राजकीय रंग चढू लागला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विरोधकांवर थेट निशाणा साधत, "ज्यांना स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास आहे, त्यांनी अजितदादांचे नाव वापरणे बंद करावे.

दादांच्या कुटुंबावर नाराज होऊन बाहेर पडले असतील, तर स्वतःच्या नावावर, कामावर आणि कर्तृत्वावर निवडणूक लढवावी," असा स्पष्ट संदेश दिला. 'सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पॅनल'च्या प्रचार शुभारंभप्रसंगी सुनेत्रा पवार बोलत होत्या. त्यांच्या या वक्तव्यामुळे सोमेश्वर कारखाना निवडणुकीतील राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सुनेत्रा पवार म्हणाल्या की, सोमेश्वर साखर कारखाना हा केवळ एक सहकारी साखर कारखाना नसून हजारो शेतकरी सभासदांच्या संसाराचा आधार आहे. अनेक पिढ्यांपासून शेतकऱ्यांनी ही संस्था जपली असून बळीराजा आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणारी ही संस्था आहे. त्यामुळे कारखान्याच्या निवडणुकीत अनावश्यक राजकारण करण्याची गरज नव्हती. मात्र, सध्या अनेक प्रकारच्या चर्चा आणि आरोप-प्रत्यारोप ऐकायला मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. 'दादांचे नाव नको, स्वतःचे काम दाखवा' दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाचा आधार घेत निवडणुकीच्या राजकारणात उतरणाऱ्या घटकांवर टीका करताना सुनेत्रा पवार यांनी थेट भूमिका मांडली. "स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असेल, तर दादांचे नाव वापरण्याची गरज



नाही. स्वतःच्या नावावर, स्वतःच्या कामावर आणि स्वतःच्या कर्तृत्वावर निवडणूक लढवा," असा स्पष्ट संदेश त्यांनी विरोधकांना दिला. दादांच्या कुटुंबावर नाराज होऊन कोणी बाहेर पडले असेल, तर त्यांनी स्वतंत्रपणे जनतेसमोर जावे आणि आपले काम मांडावे, असेही त्यांनी सूचित केले. 'चेअरमन नाव गाजवणारा नव्हे, भाव गाजवणारा असेल' सोमेश्वर कारखान्याच्या आगामी नेतृत्वाबाबतही सुनेत्रा पवार यांनी सूचक भाष्य केले. सर्वांना विश्वासात घेऊन कारखान्याचे पुढील नेतृत्व ठरविले जाईल, असे सांगताना "आगामी चेअरमन हा नाव गाजवणारा नसेल, तर भाव गाजवणारा असेल," असे त्या म्हणाल्या.

त्यांच्या या वक्तव्याची कारखाना निवडणुकीच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. 'दादांचा प्रत्येक गोष्टीत श्वास होता' अजित पवार यांच्या कार्याचा उल्लेख करताना सुनेत्रा पवार भावूक झाल्या. "दादांच्या जाण्याने इथला बांध, न बांध, शेती आणि परिसर सुना झाला आहे. इथल्या प्रत्येक गोष्टीत दादांचा श्वास होता. दादा स्वतः शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी आणि त्यांच्यासाठी काय केले पाहिजे, याची त्यांना जाणीव होती," असे त्यांनी सांगितले.

अजित पवार यांनी १९९२ मध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सोमेश्वर कारखान्याची जबाबदारी स्वीकारली. सर्व सहकाऱ्यांना सोबत घेत कारखाना उभा करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. कारखाना कर्जमुक्त करण्यासाठी त्यांनी आपली आमदारकी पणाला लावली आणि तब्बल ३४ वर्षे सोमेश्वर कारखान्यासाठी काम केले, असा उल्लेखही सुनेत्रा पवार यांनी केला.

निवडणुकीत 'काम विरुद्ध नाव' अशी रंगत? सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत विविध गट सक्रिय झाले असून आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. अशा परिस्थितीत सुनेत्रा पवार यांनी 'अजितदादांचे नाव न वापरता स्वतःच्या कर्तृत्वावर निवडणूक लढवा' असा दिलेला संदेश विरोधकांसाठी थेट आव्हान मानला जात आहे. त्यामुळे आगामी काळात सोमेश्वरच्या राजकारणात 'काम विरुद्ध नाव' अशी नवी राजकीय चर्चा रंगण्याची शक्यता आहे.हजारो शेतकरी सभासदांच्या संसाराचा आधार असलेल्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीला आता राजकीय रंग चढू लागला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विरोधकांवर थेट निशाणा साधत, "ज्यांना स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास आहे, त्यांनी अजितदादांचे नाव वापरणे बंद करावे.

दादांच्या कुटुंबावर नाराज होऊन बाहेर पडले असतील, तर स्वतःच्या नावावर, कामावर आणि कर्तृत्वावर निवडणूक लढवावी," असा स्पष्ट संदेश दिला. 'सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पॅनल'च्या प्रचार शुभारंभप्रसंगी सुनेत्रा पवार बोलत होत्या. त्यांच्या या वक्तव्यामुळे सोमेश्वर कारखाना निवडणुकीतील राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सुनेत्रा पवार म्हणाल्या की, सोमेश्वर साखर कारखाना हा केवळ एक सहकारी साखर कारखाना नसून हजारो शेतकरी सभासदांच्या संसाराचा आधार आहे. अनेक पिढ्यांपासून शेतकऱ्यांनी ही संस्था जपली असून बळीराजा आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणारी ही संस्था आहे.

त्यामुळे कारखान्याच्या निवडणुकीत अनावश्यक राजकारण करण्याची गरज नव्हती. मात्र, सध्या अनेक प्रकारच्या चर्चा आणि आरोप-प्रत्यारोप ऐकायला मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. 'दादांचे नाव नको, स्वतःचे काम दाखवा' दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाचा आधार घेत निवडणुकीच्या राजकारणात उतरणाऱ्या घटकांवर टीका करताना सुनेत्रा पवार यांनी थेट भूमिका मांडली. "स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असेल, तर दादांचे नाव वापरण्याची गरज नाही. स्वतःच्या नावावर, स्वतःच्या कामावर आणि स्वतःच्या कर्तृत्वावर निवडणूक लढवा," असा स्पष्ट संदेश त्यांनी विरोधकांना दिला. दादांच्या कुटुंबावर नाराज होऊन कोणी बाहेर पडले असेल, तर त्यांनी स्वतंत्रपणे जनतेसमोर जावे आणि आपले काम मांडावे, असेही त्यांनी सूचित केले. 'चेअरमन नाव गाजवणारा नव्हे, भाव गाजवणारा असेल' सोमेश्वर कारखान्याच्या आगामी नेतृत्वाबाबतही सुनेत्रा पवार यांनी सूचक भाष्य केले. सर्वांना विश्वासात घेऊन कारखान्याचे पुढील नेतृत्व ठरविले जाईल, असे सांगताना "आगामी चेअरमन हा नाव गाजवणारा नसेल, तर भाव गाजवणारा असेल," असे त्या म्हणाल्या.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जनआक्रोश मोर्चामुळे जळगावातील वाहतूक मार्गात तात्पुरता बदल



जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी : अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोध संघर्ष समिती, जळगाव जिल्ह्याच्या वतीने रविवार, ४ ऑक्टोबर रोजी जळगावात भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवतीर्थ मैदानावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून या मोर्चाला सुरुवात होऊन तो जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था तसेच शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने दुपारी १२ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत काही प्रमुख मार्गांवरील वाहतुकीत तात्पुरते बदल केले आहेत. मोर्चात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू रिपब्लिकन सेनानी आनंद राज आंबेडकर, पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी मंत्री चंद्रकांत, माजी मंत्री बबनराव घोलप तसेच ऑल इंडिया पँथर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ मधील कलम ३३ (१) (ब) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ४ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत वाहतुकीतील बदलाचे आदेश जारी केले आहेत. असे असतील पर्यायी मार्ग १. आकाशवाणी चौक ते कोर्ट चौक आकाशवाणी चौकाकडून कोर्ट चौकाकडे जाणारी वाहने आणि एसटी बसेस — आकाशवाणी चौक कवयित्री बहिणाबाई उद्यान रिंगरोड गोकुळ स्वीटमार्टशाहू कॉम्प्लेक्सकोर्ट चौक २. कोर्ट चौक ते आकाशवाणी चौक कोर्ट चौकाकडून आकाशवाणी चौकाकडे जाणारी वाहने आणि एसटी बसेस — कोर्ट चौक शाहू कॉम्प्लेक्सगोकुळ स्वीटमार्ट रिंगरोड कवयित्री बहिणाबाई उद्यान आकाशवाणी चौक ३. नेरी नाका ते स्वतंत्र चौक नेरी नाक्यावरून स्वतंत्र चौकाकडे जाणारी वाहने — नेरी नाका पांडे चौक सिव्हिल हॉस्पिटलबेंडाळे चौकचित्रा चौक कोर्ट चौक ४.प्रभात चौक ते नेरी नाका,कोर्ट चौक प्रभात चौकाकडून नेरी नाका व कोर्ट चौकाकडे जाणारी वाहने — प्रभात चौककवयित्री बहिणाबाई उद्यान रिंगरोड गोकुळ स्वीटमार्ट चौक चित्रा चौकबेंडाळे चौक नेरी नाका शाहू कॉम्प्लेक्स वाहनधारकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मोर्चाच्या कालावधीत संबंधित मार्गांवर वाहतुकीची कोंडी होऊ नये आणि नागरिकांची गैरसोय टाळता यावी, यासाठी पोलिस प्रशासनाकडून वाहतूक नियमन करण्यात येणार आहे. त्यामुळे ४ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ६ या कालावधीत वाहनधारकांनी पर्यायी मार्गांचा वापर करून पोलिस प्रशासनास सहकार्य करावे.

देशभरातील सर्व आंदोलने एकाच नकाशावर : राहुल गांधी

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'सत्याग्रह' नावाने नव्या मंचाची घोषणा केली आहे. देशभरातील आंदोलने आणि आंदोलनांना एका समान व्यासपीठावर एकत्र आणण्यासाठी राहुल गांधी यांनी 'सत्याग्रह' हे डिजिटल व्यासपीठ सुरू केले आहे. या व्यासपीठाद्वारे, देशाच्या विविध भागांमध्ये आपल्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी लढणारे लोक त्यांच्या आंदोलनांविषयी माहिती देऊ शकतील. तसेच, ते देशाच्या इतर भागांमधील अशाच विषयांवरील आंदोलने पाहू शकतील आणि गरज पडल्यास पाठिंबा मिळवू शकतील, असा या मंचाचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.

राहुल गांधी यांनी शनिवारी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर या उपक्रमाची घोषणा केली. ते म्हणाले की, देशात अनेक लोक आपल्या हक्कांसाठी लढत आहेत, पण अनेकदा त्यांना एकट्यानेच संघर्ष करावा लागतो. विद्यार्थी,



शेतकरी, आदिवासी, दलित, महिला आणि जनरेशन-झेड पिढी संघर्ष करत आहे. प्रत्येक संघर्षाची स्वतःची एक कहाणी असते, पण एकट्याने उठवलेले आवाज अनेकदा दाबले जात आहेत.'सत्याग्रह' ही एक डिजिटल वेबसाइट आहे, जिचा उद्देश देशभरात सुरू असलेल्या विविध आंदोलने आणि जनआंदोलनांविषयीची माहिती एकत्र आणणे आहे.संघटना आणि संघर्षाशी संबंधित माहिती नोंदवू शकतो. प्लॅटफॉर्मवर एखाद्या आंदोलनाशी संबंधित माहिती देण्यासाठी, लोकांना त्यांचे नाव, गट किंवा संघटनेचे नाव आणि आंदोलनाचा मुद्दा नमूद करावा लागतो. राहुल गांधी यांनी सांगितले की ही प्रक्रिया सुमारे दोन मिनिटांत पूर्ण होऊ शकते. या वेबसाइटवर एक इंटरॅक्टिव्ह नकाशा देखील आहे, जो लोकांना देशाच्या विविध भागांमध्ये सुरू असलेली आंदोलने पाहण्याची संधी देतो. या प्लॅटफॉर्मद्वारे, एखाद्या विशिष्ट मुद्द्यासाठी लढणाऱ्या लोकांना इतर राज्ये किंवा प्रदेशांमधील तत्सम आंदोलनांबद्दल माहिती मिळू शकेल. या उपक्रमांतर्गत, कार्यकर्ते त्यांच्या समस्या आणि मागण्या मांडू शकतात आणि थेट मदत किंवा पाठिंबा देखील मागू शकतात.राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, देशभरातील लोक अनेकदा एकटेच आपल्या हक्कांसाठी लढत आहेत. त्यांनी लिहिले, "परंतु एकट्याने उठणारा आवाज अनेकदा दाबला जातो. 'सत्याग्रह' हा या सर्व आवाजांना एका नकाशावर एकत्र आणण्याचा एक उपक्रम आहे." महात्मा गांधींच्या विचारांचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले की, बापूंनी सत्याग्रहाचा मार्ग दाखवला. ते म्हणाले की सत्य हे सर्वात मोठे शस्त्र आहे, परंतु सत्यासोबत एकजूट होऊन उभे राहणे ही त्याहूनही मोठी शक्ती आहे. त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या लोकांना आपल्या कथा सांगण्याचे आवाहन केले.

ऐतिहासिक बाणगंगा तलावात शेकडो माशांचा मृत्यू!

जन सम्राट टाईम्स

मुंबई । (प्रतिनिधी): दक्षिण मुंबईतील मलबार हिल परिसरातील ऐतिहासिक, पौराणिक व वारसा दर्जा लाभलेल्या पवित्र 'बाणगंगा' तलावामध्ये शेकडो माशांचा तडफडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तलावाच्या पाण्यात मोठ्या प्रमाणावर मृत मासे तरंगताना आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तलावामध्ये नियमितपणे होणाऱ्या धार्मिक विधी व पिंडदान प्रक्रियेमुळे हे पाणी प्रचंड प्रमाणावर दूषित झाले असून, त्यामुळेच माशांचा जीव गेल्याचा थेट आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली असून पालिकेच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. बाणगंगा तलावाला शहराच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनात महत्त्व आहे. त्यामुळे दररोज शेकडो भाविक या ठिकाणी पितृकार्य, श्राद्ध आणि पिंडदान करण्यासाठी



येत असतात. या विधीदरम्यान पिठाचे गोळे, भात, तीळ आणि इतर खाद्यपदार्थ तलावात विसर्जित केले जातात. हे अन्नपदार्थ तळाशी साचून मोठ्या प्रमाणावर कुजले आहेत. या सेंद्रिय घटकांमुळे पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण धोकादायक पातळीपर्यंत खालावले स्थानिक नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेत पाण्यात उतरून स्वच्छता मोहीम हाती घेतली. स्थानिकांनी पाण्यातील मृत मासे वेचून काठावर आणले असता अवघ्या काही वेळातच प्लास्टिकचे अनेक मोठे क्रेट्स मृत माशांनी तुडुंब भरले. याशिवाय, पाण्याखालून पिठाचे न कुजलेले गोळे आणि अन्नपदार्थांचे थरच्या थर बाहेर काढण्यात आले. हटवले नाही तर परिसरात तीव्र दुर्गंधी पसरेल आणि साथीचे रोग उद्भवतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.मुंबई महानगरपालिकेचे आरोग्य आणि जलसंधारण खाते या ऐतिहासिक वास्तूच्या देखभालीकडे सपशेल दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. भाविकांच्या धार्मिक भावनांचा आदर राखतानाच तलावातील जैवविविधतेचे रक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.त्यासाठी धार्मिक विधी व पिंडदान करण्यासाठी तलावाबाहेर स्वतंत्र कृत्रिम कुंडांची व्यवस्था करण्यात यावी.तलावाच्या मूळ पात्रात अन्नपदार्थ व निर्माल्य टाकण्यास सक्त मनाई करण्यात यावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी.

ज्ञानेश कुमारांविरोधात राजकारण तापलं! जंतरमंतरवर आज पुन्हा मोठा राडा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनचे (AISA) कार्यकर्ते शनिवारी नवी दिल्लीतील जंतर मंतर मैदानात पुन्हा जमल्याचे पाहायलामिळाले. कालच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जंतरमंतर परिसरा जमावबंदी लागू करण्यात आली होती. याशिवाय अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, बॅरिकेड्स आणि कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. शुक्रवारी १,००० हून अधिक आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले होते. हे आंदोलक मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या आणि मतदार यादीच्या एसआयआरच्या (SIR) विरोधात आंदोलन करत आहेत. शुक्रवारी झालेल्या अटकेनंतर, AISA च्या राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांनी कार्यकर्त्यांना शनिवारी दुपारी १ वाजेपर्यंत जंतर मंतरवर परत येण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर आज पुन्हा देशभरातील विविध संघटनांचे कार्यकर्ते जंतरमंतर परिसरात दाखल झाल्याचे पाहायला मिळाले.कार्यकर्ते जमल्याबरोबरच पोलिसांनी लोकांना ताब्यात घेण्यास सुरुवात केली. जंतर मंतरकडे (Jan-



tar Mantar) जाणाऱ्या रस्त्यांवर बॅरिकेड्स उभारण्यात आले होते आणि अनेक ठिकाणी सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले होते. शुक्रवारच्या आंदोलनात अटक करण्यात आलेल्यांमध्ये AAP चे नेते आणि कार्यकर्ते योगेंद्र यादव यांचाही समावेश होता. त्यानंतर आज पुन्हा जंतरमंतरवर मोठा गोंधळ झाला. शुक्रवारी संध्याकाळी, नेहा बोरा यांनी एक व्हिडिओ संदेश जारी करत, आंदोलन सुरूच राहील आणि कार्यकर्त्यांनी जंतर मंतरवर परत यावे, असे आवाहन केले होते. तसेच, पोलिसांच्या अटकेला आंदोलक घाबरणार नाहीत आणि ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीच्या समर्थनार्थ जंतरमंतरवर संघटनेचे आंदोलन सुरूच ठेवणार असल्याची घोषणा केली होती. त्यानंतर आज दुपारी पुन्हा एकदा जंतरमंतरवर मोठ्या संख्येने आंदोलक जमा झाले होते.दिल्ली पोलिसांनी शुक्रवारच्या आंदोलनाला परवानगी नाकारली. यानंतर दिल्लीत सुरक्षा वाढवण्यात आली. इतकेच नव्हे तर, जंतर मंतरच्या आसपासच्या रस्त्यांवर बॅरिकेड्स लावण्यात आले होते. शुक्रवारच्या आंदोलनादरम्यान परिसरातील अनेक मेट्रो स्थानके बंद ठेवण्यात आली होती. दुसऱ्या दिवशीही जंतर मंतरच्या परिसरात पोलीस बंदोबस्त कायम आहे. आयसा (AISA) आणि इतर संघटना आपले आंदोलन पुढे नेण्याचा प्रयत्न करताना पाहायला मिळाल्या. पण पोलिस आणि आंदोलकांमध्ये बाचाबाची आणि धरपकड सुरू झाली. वेक जोशी यांनी एसआयआरशी संबंधित निर्णयांवर आणि आदेशांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप नोंदवल्याचे एका अहवालात उघड झाल्यानंतर काही दिवसांनी हे आंदोलन सुरू झाले आहे.

महाराष्ट्रातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु!

सोलापूरमध्ये सर्वाधिक ५८ टक्के कमतरता, मराठवाड्यातही चिंताजनक स्थिती

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: राज्यातील पावसाळी हंगाम आता अखेरच्या टप्प्यात पोहोचला असून, महाराष्ट्रातून नैऋत्य मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) ३ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रातील काही भागांतून मान्सूनने माघार घेतल्याचे जाहीर केले. विशेष म्हणजे, यंदाच्या पावसाळ्यात राज्यातील ३६ पैकी २० जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे मान्सूनच्या परतीसोबतच राज्यातील शेती आणि पाणी व्यवस्थापनासमोरील आव्हानेही वाढण्याची शक्यता आहे. यंदा राज्यात पावसाचे वितरण अत्यंत असमान राहिले. काही जिल्ह्यांमध्ये समाधानकारक किंवा अतिरिक्त पाऊस झाला असला, तरी मराठवाडा आणि राज्याच्या काही भागांत पावसाची मोठी कमतरता जाणवली. IMDच्या आकडेवारीनुसार, सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ५८ टक्के पावसाची तूट नोंदली गेली आहे. त्यापाठोपाठ बीडमध्ये ५१ टक्के, हिंगोलीत ४९ टक्के, जालन्यात ४८ टक्के, अहिल्यानगरमध्ये ४६ टक्के आणि धाराशिवमध्ये ४५ टक्के तूट नोंदवण्यात आली आहे. मराठवाड्यात सर्वाधिक चिंता पावसाच्या कमतरतेचा सर्वाधिक फटका मराठवाड्याला बसला आहे. छत्रपती संभाजीनगर वगळता मराठवाड्यातील



सर्व जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट नोंदवण्यात आली असून, अनेक जिल्ह्यांमध्ये ही तूट ३४ ते ४९ टक्क्यांच्या दरम्यान आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील पेरणी, उपलब्ध पाणीसाठा आणि आगामी शेती नियोजनाबाबत शेतकऱ्यांसमोर प्रश्न निर्माण झाले आहेत. या आकडेवारीमुळे राज्यातील पावसाचे असमान वितरण पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे, नाशिक आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये हंगामी पाऊस सरासरीपेक्षा अधिक राहिला, तर मुंबई, ठाणे, पुणे, रायगड आणि रत्नागिरीमध्ये पाऊस साधारण सामान्य श्रेणीत राहिला. महाराष्ट्रातून मान्सूनची माघार वेगाने हवामान विभागाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रातून मान्सूनच्या माघारीसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. राज्यातील काही भागांतून माघार सुरू झाल्यानंतर पुढील काळात उर्वरित भागांतही मान्सूनची माघार पुढे सरकण्याची शक्यता आहे. पुणे शहरापर्यंतही मान्सूनची माघार पोहोचली असून, यंदाचा हा परतीचा प्रवास अलीकडच्या काही वर्षांच्या तुलनेत लवकर झाल्याचे हवामान विभागाच्या माहितीतून स्पष्ट होते. राज्याची सरासरी तूट १९ टक्क्यांपर्यंत १ जून ते ३० सप्टेंबर या चार महिन्यांच्या मान्सून हंगामात महाराष्ट्रात ८०४.४ मिमी पाऊस नोंदला गेला, तर या कालावधीतील सरासरी पाऊस ९९४.५ मिमी आहे. त्यामुळे राज्यात एकूण सुमारे १९ टक्के पावसाची तूट राहिली. मात्र ही तूट २० टक्क्यांच्या मर्यादेपेक्षा कमी असल्याने संपूर्ण राज्याचा मोसमी पाऊस IMDच्या निकषानुसार 'सामान्य' श्रेणीत राहतो. पुढे शेतीसमोर काय आव्हान? मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाल्याने आता शेतकऱ्यांचे लक्ष रब्बी हंगामाकडे लागले आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट आहे, तेथे जमिनीतील ओलावा, विहिरी व धरणांमधील पाणीसाठा आणि रब्बी पिकांसाठी उपलब्ध पाणी यांचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे पावसाची जिल्हानिहाय तूट लक्षात घेऊन प्रशासनाला जलसाठा आणि कृषी नियोजनावर विशेष भर द्यावा लागणार आहे.

नेहा बोराला अटक, दिल्लीत पुन्हा इंटरनेट बंद

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: दिल्लीतील जंतर मंतरवर मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात आंदोलनाची हाक देणाऱ्या ऑल इंडिया स्टूडेंट्स एसोसिएशन च्या राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेससह देशभरातील विरोधी पक्षांनी मोहीम सुरू केली आहे. विरोधी पक्ष शुक्रवारी (२ ऑक्टोबर) दिल्लीतील जंतर मंतर येथे आंदोलन करण्याची तयारी करत आहे.

त्यामुळे देशातील राजकारणा तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.दरम्यान, दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर नेहा वोरा यांनी संतप्त प्रतिक्रीया दिली आहे. "तुम्ही देशासोबत जे केले आहे, त्यासाठी देश तुम्हाला कधीही माफ करणार नाही. आज तुम्ही आम्हाला बसेस मध्य भरत भरून लोकशाहीचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहात.

पण पण एक दिवस तुम्हाला, दोनशे, दोन हजार, दोन लाख, २० लाख लोकांना भरण्याची वेळ येईल, त्यानंतरही तुम्ही ज्ञानेश कुमार आणि इतर निवडणूक आयुक्ता यांना वाचवण्याचा प्रयत्न करावा लागेल. पण तुम्ही जी गद्दारी केली आहे. चोरी केली आहे, ज्ञानेश कुमार यांनी देशाच्या जनतेसोबत जे केलं आहे त्याला माफी मिळणार नाही आणि ते विसरले जाणार नाही." असा इशारा नेहा वोरा यांनी दिला आहे.दरम्यान, कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) मुंबईत आंदोलन करण्याची तयारी करत आहे.